# जनसंपर्क अधिकारी

**मिरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालय**

**रामनगर सृष्टी, मिरारोड पुर्व ता. जि. ठाणे- ४०११०७**

Mail ID- pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in

**प्रेसनोट २४७- २३** **दिनांक : - ०७/०८/२०२३**

## अनाधिकृत ५५ इमारतीमधील सदनिका ग्राहकांना विक्री करुन शासनाचा कोटयावधी रुपयाचा महसुल बूडवून शासनाची व ग्राहकांची फसवणुक करणाऱ्या आरोपीतांना अटक - विरार पोलीस ठाणेची कामगीरी

मा.जिल्हाधिकारी ठाणे, पालघर व उप संचालक, नगररचना विभाग, वविशमनपा यांची बनावट सही,बनावट शिक्के वापरुन बनावट बांधकाम परवानगी, बनावट बिनशेती परवानगी, बनावट भोगवटा प्रमाणपत्र,बनावट सर्च रिपोर्ट बनवुन त्याआधारे रेरा ॲथॉरीटीची दिशाभुल करून रेरा नोंदणी करून सक्षम प्राधीकाऱ्याची कोणतीही परवानगी न घेता "रूद्रांश ए" हि इमारत व "रुद्रांश बी" ही Residential G+5 अनधिकृत इमारत बांधुन सह दुय्यम निबंधक वर्ग-२, वसई-५ येथे बनावट बांधकाम परवानगीच्या आधारे ग्राहकांना ४० च्या वर नोंदणीकृत दस्त करून दिले. तसेच महापालीकेने निष्काषनाची कारवाई करून सदनिकांना सिल लावल्यानंतरही सिल तोडुन सदनिका रहिवास करण्यासाठी देऊन महापालीकेची व सदनिका घेणाऱ्या नागरीकांची फसवणुक केल्याबाबतची फिर्याद श्री.गणेश हिलाल पाटील, वय- ४४ वर्षे, धंदा-नोकरी (प्रभारी सहाय्यक आयुक्त, व.वि.श.म.न.पा, प्रभाग समिती सी, चंदनसार), रा. १०१, ला-बेला अपार्टमेंट, फादरवाडी, गोखीवरे, ता.वसई जि.पालघर यांनी दिल्याने विरार पोलीस ठाणे गुन्हा रजि. नं. १५२/२०२३, भा.द.वि.सं. कलम ४२०,४६५,४६७,४६८,४७१,४७२, ४७४,४७५,१२०(ब),३४ सह एमआरटीपी कायदा कलम ५२,५३,५४ सह महाराष्ट्र ओनरशिप ऑफ फ्लॅट ॲक्ट सन १९६३ चे कलम ३,४,१३ सह नोंदणी अधिनियम १९०८ चे कलम ८२ प्रमाणे रूद्रांश रियल्टर्स चे विकासक/जमिन मालक व भागीदार यांचेविरुध्द दिनांक ०९/०२/२०२३ रोजी गुन्हा दाखल करण्यात आलेला होता.

सदर गुन्हाचे तपासामध्ये आरोपीत १) दिलीप कैलास बेनवंशी, वय- ३१ वर्षे, मे. रूद्रांश रियल्टर्स तर्फे विकासक/जमिन मालक रा.कल्पवृक्ष कॉम्प्लेक्स, न्यु होम पॅराडाईज, एकता पार्क जवळ, विरार(प), ता. वसई जि. पालघर आणि ए-००१, तळमजला, रूद्रांश अपार्ट मेंट, फादर ॲग्नेल स्कुलजवळ, चंदनसार, विरार पुर्व, ता. वसई जि. पालघर २)मच्छिंद्र मारूती व्हनमाने,वय- ३७ वर्षे, मे. मयुर इंटरप्रायजेसचा मालक रा. रूम नं.सी-४०३, अग्रवाल लाईफ स्टाईल, बि.नं.सी-३, ग्लोबल सिटी, विरार(प), ता. वसई, जि.पालघर ३)दिलीप अनंत अडखळे, वय- ४० वर्षे, फिनीक्स कार्पोरेशनचे मालक रा. रूम नं.सी-२०२, यशवंत दिप, सुंदर नगर, बोळींजरोड, विरार(प), ता. वसई, जि. पालघर ४)प्रशांत मधुकर पाटील, वय- ३३ वर्षे, मे. रूद्रांश रियल्टर्स चे भागीदार रा. रूम नं.सी-७०१, रघुविर समर्थ अपार्ट मेंट, स्वामी समर्थ नगर, फुलपाडा, विरार(पु), ता. वसई, जि. पालघर ५)राजेश रामचंद्र नाईक, वय-५४ वर्षे, धंदा- रबर स्टॅम्प बनविणे, रा. ६६४, ज्ञानेश्वरी, उमराळा पाटील आळी, एमएसईबी ऑफीसच्या बाजुला, बोळींज सोपारा रोड, नालासोपारा(प), ता.वसई, जि. पालघर यांना अटक करण्यात आली आहे.

आरोपी मच्छींद्र व्हनमाने याचे मयुर इंटरप्रायजेस,रियल इस्टेट एजन्सी, विरार (प) ऑफीसमधुन अनधिकृत बांधकाम केलेल्या सर्व्हे नं. १३७, हिस्सा नं. २ अे, कोपरी, या जमीनीचे ७/१२ उतारे, जिल्हाधिकारी पालघर यांचे नावाची बिनशेती परवानगी, वविशमनपा नगररचना विभाग यांचे नावाची बनावट बांधकाम परवानगी,आर्कीटेक्ट मेस्त्री असोसीएटस, प्रसाद बंगलो, जिवदानी रोड, विरार पुर्व यांचे नाव असलेली ब्ल्यु प्रिंट, तसेच इतर बनावट परवानग्याची कागदपत्रे,बनावट कागदपत्रे बनविण्यासाठी वापर करत

असलेला संगणक, लॅपटॉप, स्कॅनर तसेच वेग वेगळया विकासकांच्या व आर्कीटेक्टच्या नावाचे २२ रबरी शिक्के, लेटरहेड इत्यादी साहित्य जप्त करण्यात आलेले आहे.

आरोपी दिलीप अनंत अडखळे, याचेकडुन जिल्हाधिकारी ठाणे, उप जिल्हाधिकारी, उप संचालक वविशमनपा, ग्रामसेवक, सरपंच, ग्राम विकास अधिकारी, दुय्यम निबंधक वसई व भिवंडी, एमएमआरडीए विवीध आर्कीटेक्ट व विकासक आणि डॉक्टर, वकील यांचे ९३ शिक्के मिळुन आलेले आहेत. तसेच बनावट सीसी बनविण्यासाठी लागणारे वसई विरार महानगरपालीकेचे ६०० लेटरपॅड, सिडकोचे ५०० लेटरहेड मिळुन आलेले आहेत. तसेच एकुण ५५ फाईल्स मिळुन आलेल्या असून त्या फाईल्समध्ये विविध विकासकांना बनवुन दिलेल्या बनावट बांधकाम परवा नग्या, ओसी, नकाशे, ब्ल्यु प्रिंट आहेत.

आरोपी प्रशांत मधुकर पाटील याचेकडुन रूद्रांश ए इमारत व रुद्रांश बी अनधिकृत इमारतीची मुळ बनावट सीसी, मुळ बनावट ओसी, आर्कीटेक्टचा बनावट प्लॅन इत्यादी कागदपत्र हस्तगत करण्यात आलेली आहेत.

आरोपी राजेश रामचंद्र नाईक याचेकडून बनावट शिक्के बनवण्यासाठी वापरात असलेली राखाडी रंगाची रबरी शिक्के बनविण्याचे आडव्या बॉक्स आकाराचे लोखंडी मशीन त्यास समोरील बाजुस दोन लोखंडी हॅन्डल, लाल रंगाची तीन विदयुत पुरवठयाची स्वीच,त्याचे बाजुस काळया रंगाचे चौकोनामध्ये लाल रंगाची लहान स्कीन, एक लाल रंगाचे बटन असलेले तसेच इंग्रजीत DIGITAL TIMER व CREATIVE असे नाव असलेले त्याचे आतील बाजुस एक पार दर्शक काच व फिलीप्स कंपनीच्या लहान आकाराच्या ०८ टयुबलाईट असलेली बनावट शिक्के बनविण्याची वापर केलेली मशिन हस्तगत करण्यात आलेली आहे.

अटक आरोपीत यांनी आपसात संगणमत करुन वसई विरार महानगरपालीकेकडील तसेच त्यापूर्वी अस्तीत्वात असलेली सीडको यांचे कार्यालयाचे सीसी, ओसी, मा.जिल्हाधिकारी ठाणे यांचेकडील एन ए परवानंगी, दुय्यम निबंधक कार्यालय वसई यांचेकडे सादर केलेले दस्त, तहसिलदार कार्यालय यांचेकडील जागा मालक यांच्या जागा गावठाण असल्या बाबतचे नाहकरत प्रमाणपत्र ,सर्च रिपोर्ट तसेच इतर बनावट कागदपत्र त्याचप्रमाणे बांधकाम मंजूरसाठी लागणारे विविध शासकीय कार्यालयाचे एकूण ११५ बनावट शिक्के तयार करुन त्या आधारे रेरा ॲथॉरीटीची दिशाभुल करून रेरा नोंदणी करून घेवून वसई विरार परिसरात ५५ अनाधिकृत इमारतीचे बांधकाम केले. तसेच आरोपीतांनी स्वतःच्या आर्थीक फायदयासाठी शासनाचा कोटयावधी रुपयाचा महसुल बुडविल्याचे तपासात निषन्न झाले आहे.

सदरची कामगीरी श्री. मधुकर पाण्डेय, पोलीस आयुक्त, श्री.श्रीकांत पाठक, अपर पोलीस आयुक्त, श्री. सुहास बावचे, पोलीस उप आयुक्त परिमंडळ ३ विरार, श्री.रामचंद्र देशमुख, सहाय्यक पोलीस आयुक्त विरार विभाग यांचे मार्गदर्शनाखाली विरार पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री. राजेंद्र कांबळे, पो.उप.निरी. तात्या सावंजी, स.फौ.सुरेंद्र शिवदे, पो.अं. दिलीप चव्हाण यांनी केलेली आहे.

----ooo-----